# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)
11,अशोक रोड, नवी दिल्ली-110001
फोन नः 23005700, फॅक्सः 23005787

**<u>भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, श्री मुख्तार अब्बास नकवी यांचे प्रेस वक्तव्य</u>**

**नवी दिल्ली 13 डिसेंबर2013 -** भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष तसेच केंद्रीय कार्यक्रम समन्वय प्रभारी श्री मुख्तार अब्बास नकवी यांनी सांगितले की लोहपुरुष सरदार पटेल यांची पुण्यतिथी 15 डिसेंबरला राष्ट्रीय एकता, गौरव तसेच सुराज्याच्या संकल्पा बरोबरच होत असलेल्या **'रन फॉर युनिटी'** कार्यक्रमात भाजपा भाग घेत आहे.

श्री नकवी यांनी सांगितले की भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार, गुजरात चे मुख्यमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या द्वारे घोषित सरदार पटेल यांच्या जगातील सर्वात मोठ्या प्रतिमेच्या निर्माण हेतू लोह संग्रहण तसेच माती संग्रहण कार्यक्रमाच्या शुभारंभापूर्वी देशभरातील सर्व ठिकाणी **'रन फॉर युनिटी'** कार्यक्रम होईल, ज्यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, क्रीडा तसेच कलेशी संबंधित सर्व क्षेत्रातील लोक शामील होतील. सर्व ठिकाणी **'रन फॉर युनिटी'** धाव 02 कि.मी. पर्यंत होईल.

श्री नकवी यांनी सांगितले की भाजपाचे सर्व प्रमुख राष्ट्रीय नेते, मुख्यमंत्री, प्रांतीय नेते, जिल्हा तसेच त्याच्या खालील विभागाचे कार्यकर्ता, खासदार, लोकप्रतिनिधी **'रन फॉर युनिटी' तसेच लोह संग्रहण-माती संग्रहण** कार्यक्रमात भाग घेतील. संपुर्ण देशातील प्रत्येक व्यक्ती व गावाची साथ घेऊन त्यांच्या भागीदारीसह या **'राष्ट्रीय तीर्थ' चे** निर्माण होईल, जो एकात्म भारताचा गौरव तसेच प्रेरणा स्थळ बनेल.

श्री नकवी यांनी सांगितले की गुजरात चे सरदार सरोवर बांधावर दुनियातील सर्वात उंच प्रतिमा बनेल, जी अमेरिकेच्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टी पेक्षाही मोठी असेल. सरदार पटेल यांनी देशाला 565 विशाल राज्यांना एकतेच्या सूत्रात बांधले त्यामुळे त्यास **'स्टॅच्यू ऑफ युनिटी'** असे नाव दिले गेले आहे. हे गुजरातचे मुख्यमंत्री आणि भावी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे ड्रीम प्रोजेक्ट आहे.

सरदार यांच्या वक्तित्वानुसार या प्रतिमेची उंची 182 मीटर अर्थात 600 फुट म्हणजेच 60 मजल्याइतकी असेल तर स्टॅच्यू ऑफ लिबर्टी ची उंची 93 मीटर आहे.

श्री नकवी यांनी सांगितले की या मिशन मध्ये पूर्ण देशाला जोडण्यासाठी श्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सर्व सरपंचांना एक पत्र पाठविण्यात आले आहे. सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय एकता ट्रस्ट यांच्याकडून विद्यालयात निबंध, भाषण, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे तर जिल्हापातळीवर लोकगीत स्पर्धा होईल, जी सरदार पटेल यांचे जीवन, राष्ट्रीय एकता, सुराज्यावर श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना घेऊन होत आहे.

श्री नकवी यांनी सांगितले की, या अभियानाअंतर्गत एक हस्ताक्षर मोहिम घेण्यात येईल. नगरे, गावातील सर्व लोक त्यावर स्वाक्षरी करतील, जेणेकरुन देशातील कोटी-कोटी लोक याच्याशी जोडले गेले आहेत ते अनुभवतील. 16 ते 26 जानेवारी च्या मध्यापासून आम्ही प्रत्येक गावातून समारोह पूर्वक गावातील पवित्र माती, लोह जे शेतक-याने उपयोगात आणले असेल त्याचा तुकडा तसेच गावातील प्रमुखाचा फोटो घेऊन येणार.

लोह संग्रहणाचे राष्ट्रीय निमंत्रक श्री ओम प्रकाश धनकड यांनी सांगितले की प्रत्येक गावात आमची टीम जाईल. गीत संगीत, ढोल-ताशे, पूर्ण गावातील महिला-पुरुष आपल्या गावातील लोहाचा अंश आणि माती भावपूर्ण वातावरणात सुपूर्द करतील. ही सामग्री जमा करण्यासाठी प्रत्येक गावाची किट आमच्या जिल्हा कमिटीकडे सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय एकता ट्रस्ट कडून येत आहे. समस्त गावाची लोह सामग्री जेव्हा जिल्हा केंद्राकडे एकत्रित होईल तेव्हा गुजरात मधून सुसज्जित वाहन सन्मानाने ही सामग्री आणण्यात येईल. ज्यांना आपण हजारोंच्या संख्येने एकत्र येऊन त्यांना निरोप देऊ.

श्री ओम प्रकाश धनकड यांनी सांगितले की या अभियानाच्या अधिक माहितीसाठी लोकांनी टोल फ्री नंबर 18002333110 तसेच www.runforunity.com आणि www.statueofunity.in वेबसाईट सुरु करण्यात आली आहे त्यावर संपर्क साधावा. श्री नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या या महान स्वप्नाशी जोडण्यासाठी सर्वांनी 08000980009 डायल करु शकता.

श्री नकवी यांनी सांगितले की पक्षाचे वरिष्ठ नेते श्री लालकृष्ण आडवाणी हे अहमदाबाद तसेच श्री नरेंद्र मोदी बडोदा, श्री राजनाथ सिंह, श्री अरुण जेटली, डॉ मुरली मनोहर जोशी, श्री राम लाल

जी हे दिल्ली मध्ये राहतील. श्रीमती सुषमा स्वराज भोपाळ (मध्य प्रदेश) मध्ये, श्री एम.व्यंकय्या नायडू, श्री गोपीनाथ मुंडे मुंबई, श्री नितिन गडकरी नागपुरात राहतील. श्री अनंत कुमार बंगळूर, श्री थावर चंद्र गहलोत इंदौर, श्री मुख्तार अब्बास नकवी आग्रा, श्री यशवंत सिन्हा औरंगाबाद, श्री रविशंकर प्रसाद, श्री सुशील कुमार मोदी तसेच श्री धर्मेंद्र प्रधान पाटणा, श्री अमित शाह हरियाणा, श्री पुरुषोत्तम भाई रुपाला (बिहार), श्री मुरलीधर राव लखनौ, श्री राजीव प्रताप रुडी पंजाब, श्री प्रकाश जावडेकर हैद्राबाद, श्री पियुष गोयल बंगळूर, श्री विनय कटियार कानपुर, श्री एस.एस, अहलुवालिया आसाम, श्री बलवीर पुंज मेरठ, श्री चंदन मित्रा ओरिसा, श्री भूपेंद्र यादव जयपुर, श्रीमती निर्मला सितारामन तामिळनाडू, श्रीमती स्मृति इराणी पं. बंगाल, श्रीमती मीनाक्षी लेखी केरळ, श्री कलराज मिश्र गाजियाबाद, कॅप्टन अभिमन्यू पुदुचेरी, श्री शाम जाजू अंदमान-निकोबार, श्रीमती सरोज पांडे रायपुर, श्री अनुराग ठाकुर जम्मू, श्री ओम प्रकाश घनकड चंदिगड, श्रीमती पूनम महाजन मुंबई, श्री किरण रिज्जू, श्री रमन डेका, श्री तापिर गांव अरुणाचल प्रदेश, श्रीमती विजया चक्रवर्ती गुवाहाटी, श्री अनिल जैन दिल्ली, श्री लक्ष्मी कांत बाजपेयी वाराणसी, श्री के. लक्ष्मण कर्नाटक, श्री हुकुम देव यादव हरियाणा, श्री सिद्धार्थ नाथ सिंह अलाहाबाद, श्री श्रीकांत शर्मा मथुरा, श्री सरयु राय रांची, श्री विजय पाल तोमर मुरादाबाद येथे राहतील.

यांच्याव्यतिरिक्त अन्य वरिष्ठ नेते सुद्धा देशाच्या वेगवेगळ्या भागात होणा-या कार्यक्रमात भाग घेतील.

(श्री अरुण कुमार जैन)

कार्यालय सचिव